ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

# शाश्वत विकासच भविष्याची अजोड भेट !!

**प्रा. डॉ. सुदाम राठोड**

*सा. प्राध्यापक,*

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य महाविद्यालय, मोराणे, धुळे (महाराष्ट्र)*

**प्रस्तावना:**

जागतिक सर्व समावेशी विकासासाठी शाश्वत विकासाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संपूर्ण जगाने एक होणे ही काळाची गरज आहे. आज निरंतर शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संपूर्ण समाज एकत्र नाही आला तर भविष्य अंधकारमय आहे हे नाकारता येत नाही. समाज जीवन सुखी समाधानी होण्यासाठी सर्व राष्ट्रांनी शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्यापक धोरण आखले पाहिजे आणि या व्यापक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कटीबद्ध असले पाहिजे.

संयुक्त राष्ट्र संघटनेने निर्धारित केलेली सर्व उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून ते वेळेवर साध्य होणे समाज हिताच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी सर्व राष्ट्र धोरण अत्यंत आवश्यक आहे. समाजातील सर्व स्तरातून शाश्वत विकासासाठी जनजागृती अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रमुखांची इच्छाशक्ती अत्यंत महत्त्वाची आहे. प्रखर इच्छाशक्तीच्या आणि संवेदनशील राष्ट्र प्रमुखांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वातूनच शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होऊ शकतात.

वास्तविक पाहता समाज हिताच्या आणि त्या त्या राष्ट्राच्या व्यापक समस्या निर्मूलनासाठी सर्वंकष तसेच सर्वसमावेशी प्रशासनातील कार्यरत मुख्य अधिकारी यांचे वेळोवेळी व्यापक पातळीवर तर सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होणे तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेने ठरवून दिलेली ध्येय साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**शाश्वत विकासाची परिभाषा :**

**१. डेव्हिड पियर्स** :शाश्वत विकास म्हणजे सामाजिक उद्दिष्टांची बेरीज होय ज्यामध्ये दररोज वास्तव उत्पन्नात वाढ आरोग्य शिक्षणात सुधारणा शैक्षणिक प्रगती संसाधन वापराचा अधिकार उत्पन्नाचे योग्य वाटप स्वातंत्र्यामध्ये वाढ इत्यादी बाबी हत्या आवश्यक आहेत.

**२. विकास विषयक आयोगाच्यामते:** विकास म्हणजे जो वर्तमानकालीन जनतेच्या गरजा, अशा आकांक्षा भागवीने

बाबत तडजोड नसणे म्हणजे शाश्वत विकास होय.

**संशोधन पद्धती:**

**उद्देश :**

१. शाश्वत विकासाची संकल्पना समजून घेणे

२. शाश्वत विकास व समाज जीवन समजून घेणे

३. शाश्वत विकास आणि राष्ट्र समोरील आव्हाने जाणून घेणे

४. शाश्वत विकासाचे दूरगामी परिणाम पडताळून पाहणे.

**पद्धती :**

सदरील शोध निबंध लिहिताना दुय्यम तथ्य सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे .त्याचबरोबर वर्तमानपत्रे, वेबसाईट, मासिके ,पुस्तके यांचाही आधार घेण्यात आलेला आहे

जागतिक पातळीवर शाश्वत विकासासाठी निश्चित करण्यात आलेली ध्येय यामध्ये

१. गरिबी नष्ट करणे

२.शून्य उपासमार

३.आरोग्य व लोककल्याण

४.गुणवत्ता दाई शिक्षण

५.स्त्री पुरुष समानता

६.पाणी आणि स्वच्छता

७.सुलभ आणि स्वच्छ ऊर्जा

८.सभ्य रोजगार आणि आर्थिक वाढ

९.उद्योग, नवीन उपक्रम आणि पायाभूत सेवा सुविधा

१०.आर्थिक असमानता

११.शाश्वत शहरे आणि समुदाय

१२.जबाबदार आणि उत्पादन

१३.हवामान प्रक्रिया

१४.पाण्याखालील जनजीवन

१५.जमिनीवरील जनजीवन

१६.शांती, न्याय आणि मजबूत संस्था

१७. लक्षा साठी भागीदारीत वाढ करणे.

**१. गरीबी नष्ट करणे:**

सर्व सदस्य राष्ट्रातील गरिबी हा मोठा प्रश्न आहे तसे पाहता मानवी समूहासाठी गरिबी हे शाप आहे अशा परिस्थितीत राष्ट्रांतर्गत गरिबी हा राष्ट्र विकासातील सर्वात मोठा अडथळा आहे, म्हणून शाश्वत विकासाच्या या प्रक्रियेत संपूर्ण गरिबी उनमूलन करणे त्यासाठी सर्वंकष धोरण त्या त्या राष्ट्राने आखणे व त्याची वेळीच अंमलबजावणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**२. शून्य उपासमार:**

शाश्वत विकासासाठी राष्ट्रांतर्गत उपासमारी चे बळी ची संख्या कमी केली पाहिजे. नव्हे तर ती शून्यापर्यंत आणली पाहिजे .यासाठी जनतेला उपाशी राहायची वेळ येणार नाही अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

**३. आरोग्य व लोककल्याण**:

शाश्वत विकासातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे अन आरोग्य राष्ट्रांतर्गत आरोग्याच्या सेवा सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध झाली पाहिजे व ते सर्वांना सुलभ पद्धतीनेवापरता आले पाहिजे. आरोग्य व तालुका कल्याणकारी धोरणाची यासाठी नितांत आवश्यकता आहे.

**४. गुणवत्तादाई शिक्षण :**

देशांतर्गत व्यापक विकासासाठी गुणवत्ता ही शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे कारण आजचे गुणवत्तादायी शिक्षण ही भविष्याची खूप मोठी गुंतवणूक आहे. यासाठी शिक्षण व संशोधनासाठी नियमित प्रोत्साहन मिळाले पाहिजे

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

तरच शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होतील,स्त्री पुरुष समानता ,पाणी आणि स्वच्छता ,सुलभ आणि स्वच्छ ऊर्जा ,सभ्य रोजगार आणि आर्थिक वाढ ,उद्योग,नवीन उपक्रम आणि पायाभूत सेवा सुविधा ,आर्थिक असमानता, शाश्वत शहरे आणि समुदाय ,जबाबदार आणि उत्पादन ,हवामान प्रक्रिया पाण्याखालील जनजीवन ,जमिनीवरील जनजीवन ,शांती, न्याय आणि मजबूत संस्था, लक्षा साठी भागीदारीत वाढ करणे. इत्यादी

**संधर्भ :**

1. Sustainable Development Goals: Neeru Sidana& Kavita Indapurkar, Blumsburg Publication
2. Sustainability Leadership, Henrik Henrikson Gildan Media,Switzerland AG

*Cite This Article:*

* **प्रा. डॉ. राठोड स.,** *(2023). शाश्वत विकासच भविष्याची अजोड भेट !!,* ***Electronic International Interdisciplinary Research Journal****, XII, Issues – VI(Special Issues-I), Nov-Dec, 2023,* ***226-228.***